पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

........................................................................................................

# वार्तापत्र

दिनांक- २८/०७/२०२०

## दि. 3 जुलैच्या पोलीस-नक्षल चकमकीत कमांडर सोमा शंकरसह डेप्युटी कमांडर अमोल होयामी ठार

- **शासनाने ६ लाख रुपयांचे बक्षीस केले होते जाहीर**
- **मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे यांच्याकडुन सी-६० कमांडोचे अभिनंदन व कौतुक**

दि. ०३ जुलै २०२० रोजी उपविभाग हेडरी अंतर्गत येणाऱ्या मौजा येलदडमी जंगल परिसरात पोलीस व नक्षल यांच्यात झालेल्या चकमकीत नक्षलवाद्यांचा पेरमिली दलम कमांडर सोमा ऊर्फ शंकर यास ठार करण्यात गडचिरोली पोलीस दलाच्या बहादुर सी-६० कमांडोनी यश प्राप्त केले होते. याच चकमकीत आणखी किमान दोन नक्षलवादी ठार झाले असतील अशी शक्यता वर्ताविण्यात येत होती.

दि. ३ जुलै २०२० रोजी मौजा येलदडमी येथे झालेल्या सदर चकमकीत नक्षलवादयांच्या गट्टा दलमचा डेप्युटी कमांडर अमोल होयामी हा देखील ठार झाल्याची माहीती नक्षल पत्रकातुन प्राप्त झाली आहे. जहाल नक्षली अमोल होयामी वय- २१ वर्षे हा छत्तीसगड राज्यातील तालुका भैरामगड जि. बिजापुर येथील रहिवासी होता. तो सन २०१७ मध्ये भामरागड दलममध्ये दाखल झाला होता. त्यानंतर तो गट्टा दलमच्या डेप्युटी कमांडरपदी कार्यरत होता. त्याचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये ०३ गंभिर स्वरुपाचे गुन्हे दाखल होते. तसेच त्याचेवर शासनाने एकुण ६ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.

पेरमिली दलम कमांडर सोमा ऊर्फ शंकर तसेच गट्टा दलम डेप्युटी कमांडर अमोल होयामी यास चकमकीत कंठस्नान घालणाऱ्या बहादुर सी-६० जवानांचे मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सा‍ो. यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

